**मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन द्वारे १७००० वृक्षांचे रोपण**

मुंबई २ ऑगस्ट २०१८ : मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने हाती घेतलेल्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील वृक्षलगवडीच्या उपक्रमा अंतर्गत १७००० रोपट्यांची  लागवड पूर्ण झाली आहे. यामध्ये प्रकल्पामुळे बाधित झालेल्या झाडांच्या भरपाईपोटी करावयाची वृक्ष लागवड आणि कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्वा अंतर्गत करावयाची वृक्ष लागवड या दोन्हींचा समावेश आहे. या उपक्रमांतर्गत एकूण 20900 झाडांचे रोपण करण्यात येणार आहे. तशा प्रकारचा करार मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन आणि संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे संचालक यांच्या मध्ये डिसेंम्बर २०१७ मध्येच झाला आहे.

मुंबई मेट्रो ३ च्या वृक्षारोपणाचा दुसरा टप्पा दिनांक १ ऑगस्ट रोजी पूर्ण झाला. १३ जुलै रोजी या पहिल्या टप्प्याचे उदघाटन खासदार पूनम महाजन यांच्या हस्ते झाले होते. दुसऱ्या टप्प्यातील वृक्षारोपणाच्या कार्यक्रमात मुंबई महानगर उपयुक्त डॉ. किशोर क्षीरसागर- एम सी जी एम , मुंबई विभागीय उद्यान अधीक्षक जितेंद्र परदेशी आणि एम एम आर सीचे मुख्य प्रकल्प अधीक्षक चारुदास जाधव  यांचीदेखील विशेष उपस्थिती होती.

आतापर्यंत १७ हजार वृक्षांची लागवड झाली असून हे वृक्षारोपण एसजीएनपी अंतर्गत 1 9 हेक्टर जमिनीवर करण्यात आला आहे ज्यात  अवनत झालेल्या  वन जमिनीचा तसेच  अतिक्रमण काढुन मोकळ्या करण्यात आलेल्या जमिनीचा समावेश आहे. ही झाडे पुढील सात वर्षे टिकवून ठेवण्यासाठीची तरतूद देखील करण्यात आली आहे.

या संदर्भात बोलताना व्यवस्थापकीय संचालिका श्रीमती अश्विनी भिडे म्हणाल्या, "या वृक्ष लागवडीसाठी जागा उपलब्ध लाटून देऊन प्रत्यक्ष लागवडीचे काम ही हाती घेतला बद्दल आम्ही संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे आभारी आहोत. या  कार्यक्रमांतर्गत  पिंपळ ,कडुलिंब, बकुळ, कदंब या देशी वाणाच्या 10 ये 12 फूट उंचीचा रोपट्यांची लागवड केली गेली आहे. पुढील काही दिवसात सर्व 20900 झाडांच्या रोपणाचे काम आम्ही पूर्ण करू आणि पुढील सात वर्षां साठी त्यांची देखभाल ही करू."